३.२ पीक दाणे भरण्याच्या अवस्थेत असताना २% युरियाचे द्रावण (१० लिटर पाण्यात २०० ग्रॅम युरिया) फवारावे.

३.३ पक्व झालेल्या पिकाची वेळीच काढणी व मळणी करावी.

३.४ गव्हाच्या पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच डायथेन एम-४५, २५ ग्रॅम किंवा १० ग्रॅम बावीस्टीन किंवा ३० ग्रॅम मॅन्कोझेब प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

३.५ शेतात उंदराची बिळे आढळून आल्यास प्रथम बिळे मुजवावीत. दुसऱ्या दिवशी उकरलेल्या बिळांत तीन दिवस विष विरहीत तेल लावलेल्या धान्याचा भरडा घेऊन त्याला गोडेतेल चोळावे व बिळात टाकावे व नंतर एक भाग झिंक फॉस्फाईड मिसळून २० ग्रॅमच्या वड्या तयार कराव्यात आणि एका बिळाशेजारी एक वडी ठेवावी.

३.६ गव्हावर काळा मावा कीड आढळून किडीच्या जैविक नियंत्रणासाठी मेटॅऱ्हायझियम ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. या पिकावर लेडी बर्ड बिटल या मित्र किडीचा प्रौढ अथवा अळ्या आढळून येत असल्यास रासायनिक औषधांची फवारणी करू नये. माव्याचे प्रमाण जास्त असलेस इमिडाक्लोप्रिड ७ मिली अथवा डायमेथोएट ३० इ.सी. १० मिली अथवा मिथील डिमेटॉन २५ इ.सी. ८ मिली अथवा लॅम्डा सायहॅलोथ्रिन ५ इ.सी. ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

४) <u>हरभरा</u> :

४.१ ऊशीरा पेरणीच्या पिकास घाटे भरण्याच्या अवस्थेत पाणी द्या.

४.२ घाटे अळीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास २० मि.ली. हेलीओकील १० लिटर पाण्यात मिसळून त्याची फवारणी करावी किंवा ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. शेतामध्ये लिंग प्रलोभ सापळे हेक्टरी ५ लावावेत.

४.३ कापणीस तयार झालेल्या पिकाची वेळीच काढणी व मळणी करून धान्य ऊन्हात चांगले वाळवून साठवा.

५) **<u>सूर्यफूल (रब्बी)</u> :**

५.१ रब्बी हंगामातील पक्व झालेल्या सूर्यफूल पिकाची वेळीच काढणी व मळणी करा.

६) **<u>उन्हाळी भुईमूग</u> :**

६.१ पेरणी १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करावी. पेरणी वापश्यावर करावी.

६.२ पेरणीपूर्वी एक किलो बियाण्यास कार्बेन्डझीम २.५ ग्रॅम अथवा ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम बुरशीनाशक याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. बियाण्यास प्रत्येकी २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे या प्रमाणात रायझोबियम अधिक स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धनाची बीजप्रक्रिया करावी.

६.३ रासायनिक खते : हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद संपूर्ण पेरणीच्यावेळी द्यावे. सोबत २०० किलो जिप्सम पेरणीच्या वेळी व २०० किलो पेरणीनंतर ३० दिवसांनी द्यावे.

६.४ सुधारित वाण : सुधारित वाणाचा वापर करा. पेरणीसाठी फुले उन्नती, फुले उनप, टीजी२६, फुले आरएचआरजी ६०२१, टीएजी २४, टीजी २६, जेएल ५०१, टीपीजी ४१, फुले व्यास यापैकी एका वाणाची निवड करावी.

| प्रकार | पेरणी (सें.मी) | बियाणे(किलो प्रति हेक्टरी) |
|---|---|---|
| उपट्या | ३० X १० सें.मी. | १००-१२० |
| निमपसऱ्या | ३० X १५ सें.मी | ८०-९० |
| पसऱ्या | ४५ X १० सें.मी | ७०-८० |